**"सप्टेंबर २०१८" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ५ सप्टेंबर २०१८ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या कार्मिक, लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालयाचे Recommendation of Seventh Central Pay Commission – Implementation of decisions relating to grant of Children Education Allowance (CEA) and Hostel Subsidy – Consolidated instructions - या विषयाचे No.A-27012/02/2017-Estt-(AL), Dt.17.07.2018 चे Office Memorandum माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी निर्गमित केले आहे.
- दिनांक ५ सप्टेंबर २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये अतिरिक्त कार्यभार सोपविताना विचारात घ्यावयाच्या मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक ५ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेस संचालक या पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेले श्री.संजय बाहेकर, उपकुलसचिव राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक ११ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयांच्या आस्थापनेवरील १९५ अस्थायी पदांना दिनांक २८ फेब्रुवारी २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक १२ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेस ऑगस्ट ते डिसेंबर २०१८ या सात महिन्यांकरिता अनिवार्य खर्चासाठी (प्रशिक्षण शुल्क) रु.१८०.०० लाख इतके अनिवार्य सहायक अनुदान (दुसरा हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक १२ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशासन प्रबोधिनी, अमरावती या संस्थेस ऑगस्ट ते डिसेंबर २०१८ या पाच महिन्यांकरिता अनिवार्य खर्चासाठी (वेतन व वेतनेतर) रु.३०.०० लाख इतके अनिवार्य सहायक अनुदान (दुसरा हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक १७ सप्टेंबर २०१८ च्या पत्रान्वये गट-अ व गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यासाठी कंत्राटी तत्त्वावर नियुक्तीसाठी इच्छुक सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांची एकत्रित सामायिक यादी (पॅनल) प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १७ सप्टेंबर २०१८ च्या पत्रान्वये गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यासाठी कंत्राटी तत्त्वावर नियुक्तीसाठी इच्छुक सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांची एकत्रित सामायिक यादी (पॅनल) प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २१ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासन सेवा – सेवेचे पुनर्विलोकन – सुधारित पुनर्विलोकन समिती गठित करण्यात आली आहे.
- दिनांक २५ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील नाईक-४ व शिपाई-५ अशी ९ पदे निरसित करण्यात आली आहेत.
- दिनांक २६ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ मध्ये शासन सेवेत सरळसेवेने नियुक्तीच्या पदावर रुजू होण्याचा कालावधी विहित करण्यात आला आहे.

**(ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल**

- भारतीय प्रशासन सेवेतील १६ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याच्या बदलीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- एका कक्ष अधिकाऱ्याच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.

**(ग) <u>पदोन्नती / प्रपत्र बढती व मुदतवाढ / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक</u>**

- सहसचिव-५, कक्ष अधिकारी-१ अशा ६ अधिकाऱ्यांना पदोन्नतीचे नियमित दिनांक देण्यात आले आहेत.

**(घ) <u>प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>**

- उप सचिव-१, कक्ष अधिकारी-२ अशा ३ अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
- एका उच्चश्रेणी लघुलेखकाचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- दोन कक्ष अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(च) <u>प्रशिक्षण / परीक्षा</u>**

- दिनांक ६ सप्टेंबर २०१८ च्या पत्रान्वये गट-अ संवर्गात पदोन्नत झालेले अवर सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांना यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेमार्फत दिनांक ३ ते १० ऑक्टोबर २०१८ पर्यंत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.
- दिनांक ५ सप्टेंबर २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१८ चा निकाल जाहिर करण्यात आला आहे.
- दिनांक १० सप्टेंबर २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी विभागीय परीक्षा २०१८ ला पुन्हा (Repeater) बसू इच्छित असलेल्या उमेदवारांचे अर्ज दिनांक ५ ऑक्टोबर २०१८ पर्यंत पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक १० सप्टेंबर २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभाग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय यामधील सहायक कक्ष अधिकाऱ्यांसाठी सन २०१८ मधील सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा दिनांक २५ व २६ सप्टेंबर २०१८ रोजी वस्तू व सेवा कर भवन, माझगांव, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.
- दिनांक १० सप्टेंबर २०१८ च्या पत्रान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंत्रालयातील सहसचिव यांच्यासाठी उजळणी प्रशिक्षण दिनांक २२ ते २६ ऑक्टोबर २०१८ रोजी यशदा, पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे.
- दिनांक १२ सप्टेंबर २०१८ च्या शासन शुद्धीपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१८ च्या वेळापत्रकात सुधारणा (परिशिष्ट-क मध्ये) करण्यात आली आहे.
- दिनांक २५ सप्टेंबर २०१८ च्या शासन पत्रान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत सन २०१८-१९ मधील प्रशिक्षणासाठी मंत्रालयीन लिपिक-टंकलेखक संवर्गाकरिता दिनांक १ ते १२ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत विविध प्रशिक्षण संस्थेमध्ये पायाभूत प्रशिक्षण आयोजित केले आहे.

**(छ) <u>ज्येष्ठतासूची</u>**

- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याला सेवा ज्येष्ठतेचा मानीव दिनांक देण्यात आला आहे.

* * * * * *